सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि.-५/कोविड-१९सवलत/२०२३/ 5820 दिनांक : 19 DEC 2023

**परिपत्रक अत्यंत महत्वाचे.**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित संस्था.
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत....**

**संदर्भ :- १**) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्र. : बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दि. ३०.०६.२०२३.
२) संचालनालयाचे पत्र क्र.: २अ/एडीएम/२०२१/३३३, दिनांक १०.०८.२०२३.
३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(९५/२३)/विशि-३/१४९१८ दि. १७.११.२०२३.
४) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D2ODEG/45/2023-DESK2/200541/2023 दिनांक १२-१२-२०२३.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ वरील शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते की, दि. २८. जून २०२१ रोजी मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मा. कुलगुरु यांनी दिलेल्या सहमतीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना शासन पत्रात नमूद खालील मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना खालील प्रमाणे कळविण्यात आलेले होते.

१. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे आई/वडील/पालक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे पदवी/ पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपुर्ण फी माफ करण्यात यावे.
२. अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ भागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात यावे.
३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.
४. विद्यार्थ्यांव्दारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

कृ.मा.प.

५. विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही, त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.
६. सन २०२२-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.
७. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ टप्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने देखिल वेळोवेळी उपरोक्तबाबत अवगत केलेले आहे, तथापि सदर निर्देशांचे अनुपालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच विषयांकित प्रकरणी किती विद्यार्थ्यांना लाभ दिलेले आहे, याबाबतची वर्षनिहाय माहिती या विभागीय कार्यालयाच्या अधीनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूखांनी या पत्रासोबत दिलेल्या गुगल फार्म https://forms.gle/C7S3gdUbZuD1V7Rp7 लिंकव्दारे त्वरीत सादर करण्यात यावी.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

/200541/2023

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
13 DEC 2023
आवक क्र. 10668

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४४२
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

प्रति,

१. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

२. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ छ. संभाजीनगर/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय: कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.....**

**संदर्भ: १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्रमांक : बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक : ३०.६.२०२१.**

**२. संचालनालयाचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/२०२१/३३३, दिनांक १०.८.२०२१.**

**३. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे यांचे पत्र क्रमांक : युएनआय/(९५/२३)/विशि-३/१४९१८, दिनांक : १७.११.२०२३.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्रमांक १ वरील शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते की, दि. २८ जून २०२१ रोजी मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मा. कुलगुरु यांनी दिलेल्या सहमतीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना शासन पत्रात नमूद खालील मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सदर पत्राची प्रत या संचालनालयास पृष्ठांकित करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना खालील प्रमाणे कळविण्यात आलेले आहे.

१. ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनीचे आई/वडील/ पालक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यतचे संपुर्ण फी माफ करण्यात यावे.

२. अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/ उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात यावे.

३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

४. विद्यार्थ्याव्दारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

५. विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही, त्या

बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

६. सन २०२० २१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

७. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ टप्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. तसेच शुल्क थकीत , असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्रस्तूत प्रकरणी शासनाने देखिल वेळोवेळी उपरोक्तबाबत अवगत केलेले आहे, तथापि सदर निर्देशांचे अनुपालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच विषयांकित प्रकरणी किती विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे, याबाबतची वर्षनिहाय माहिती त्वरीत या संचालनालयास सादर करावी.

Signed by
Vinod Mahadeorao Mohitkar
Date: 12-12-2023 16:06:53

**(डॉ. विनोद मोहितकर)**
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत –

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई § ४०० ०३२ माहितीस्तव सादर.